# <u>वार्तापत्र</u>

## नक्षलवाद्यांनी हत्या केलेल्या कुटुंबातीलएका व्यक्तीस शासन सेवेत सामावुनघेण्याबाबत.

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली, दि. ५/०९/२०१८

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासननिर्णयक्र. एनएएक्स ०११६/प्र.क्र. ४/वि. शा. - १ ब, दिनांक ०६ मार्च २०१८ नुसारगडचिरोली या नक्षलग्रस्त जिल्हयातील नक्षलवाद्यांनी हत्या केलेल्या बातमीदारांच्याकुटुंबातील**एका व्यक्तीस**एक विशेष बाब म्हणुन जिल्हाधिकारी यांनीनक्षल पिडीतकुटुंबातीलनिर्धारीत वारसदाराला वर्ग ३ व ४ च्या पदावर शासन सेवेतथेट नियुक्तीद्यावी. असेदिशानिर्देश पारीतकेले आहे.

सदर प्रकरणेहाताळण्यासाठी मारल्या गेलेल्या गोपनीय बातमीदारांच्याकुटुंबापैकी पात्र असणाऱ्याएका व्यक्तीसाठी पोलीस अधिक्षक हे नक्षलपिडीतप्रमाणपत्रदेण्यास सक्षम अधिकारी राहतील, आणि संबंधीत उमेदवार हा गडचिरोली जिल्हयातील अधिवासी (डोमेसिअल) प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील. इत्यादीदिशानिर्देश आहेत.

माहे मे/जुन २०१८ मध्ये जिल्हयातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस ठाणे, उपपोलीस ठाणे, पोलीस मदतकेंद्र, प्रभारी अधिकाऱ्याचे माध्यमातुन संबधीत सर्व मृतकाचे वारसदार/नातेवाईकांना भेटुन, वेगवेगळे माध्यमातुन बातमीतसेच लेखी सुचनादेवुन दि.२५/६/२०१८ रोजी शासननिर्णयानुसार पोलीस मुख्यालय गडचिरोली येथेनक्षल पिडीत प्रमाणपत्र मेळावा आयोजितकरण्यात आला होता.

सदर मेळाव्यात सरासरी १५० ते १६० कुटुंबातील २५० ते ३०० व्यक्ती सुचीतकागदपत्रासह उपस्थितझाले. आणित्यानंतरसुद्धा अनेक पिडीतकुटुंबीयांचे वारसा प्रमाणपत्र मिळण्याचे उद्देशानेकागदपत्रासह अर्ज सादरकेले आहेत.

अद्याप पर्यंत प्राप्त अर्जातील पडताळणीनंतर शासननिर्णयानुसारतसेच शासन सेवेतनियुक्तीचे दृष्टीने आवश्यककागदपत्राची पुर्तताकेलेल्या निर्धारीत वारसांना प्रमाणपत्र प्रदानकरण्यात आले.

मात्रविविधकारणाने सदर प्रकरणात होत असलेला विलंब टाळण्यासाठी दि. २९/८/२०१८ रोजी मा. जिल्हाधिकारी यांनी आयोजीतकेलेल्या सभेत अद्यापपर्यंत **प्रमाणपत्रासाठी निवेदन**नदिलेल्या आणि अपुरी माहीतीसह दिलेलेनिवेदनतसेच अर्ज सादरनकेलेल्या पिडीतकुटुंबियातील वारसांनी पोलीस अधिक्षककार्यालय गडचिरोली येथेदि. १५/०९/२०१८ रोजी पर्यंतदाखलकरावे, असे आवाहन आहे. १५/९/२०१८ पर्यंत प्राप्तनिवेदनाचे पडताळणी होवुन पात्र व्यक्ती यांना मा. जिल्हाधिकारी यांचे वतीने शासननिर्णयानुसार ३ व ४ वर्गातील पदावर शासकीय सेवेतनियुक्तीकरण्याचे प्रथम टप्प्यातील प्रक्रिया सुरूकरणार आहेत. कृपया संबंधीतांनी सदर प्रसिद्धीनुसार शिघ्र गतीने प्रयत्नकरावे अशी विनंती आहे.